# महामेट्रो तर्फे दिव्यांग मुलांच्या हस्ते माहिती केंद्राचे उदघाटन

## स्वातंत्र्य दिनाला माहिती केंद्रात मुलांनी हातात तिरंगा घेउन आनंद साजरा केला

पुणे , १६ ऑगस्ट २०१८ : महामेट्रोतर्फे लाल बहादूर शास्त्री शाळेतील मुलांच्या हस्ते बालगंधर्व रंग मंदिराच्या आवारातील पुणे मेट्रोच्या माहिती केंद्राचे उदघाटन करण्यात आले . या मुलांना माहिती केंद्रही दाखवण्यात आले आहे . यात एकूण ३० सामान्य मुले आणि १० दिव्यांग मुलांचा सहभाग होता . तसेच दिव्यांग मुलांचे पालक आणि शाळेचे शिक्षक या उदघाटन प्रसंगी सहभागी झाले होते . यावेळी महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम , पुणे मेट्रोचे वरिष्ठ तांत्रिक सल्लागार शशिकांत लिमये आणि मार्गिका क्रमांक २ चे कार्यकारी संचालक अतुल गाडगीळ , मार्गिका क्रमांक १ चे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक गौतम बिऱ्हाडे , मार्गिका क्रमांक ३ चे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक प्रकाश वाघमारे आणि लाल बहादूर शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र ताथवडे हेही उपस्थित होते .

यावेळी मुलांबरोबर झेंडावंदन ही करण्यात आले आहे . तसेच या मुलांसाठी चित्रकलेचे साहित्य आणि फराळाचे वाटप करण्यात आले . या प्रसंगी शाळेतील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून येत होता . मुले अंत्यत आनंदित होऊन सकाळच्या फराळाचा आनंद घेतला . या केंद्रात एकूण ४ प्रशिक्षित कॉन्सलर असणार आहे . सकाळच्या शिफ्ट मध्ये २ आणि सायंकाळच्या शिफ्ट मध्ये २ अश्या पद्धतीने कॉन्सलर उपस्थित राहणार आहे .

हे कॉन्सलर पुणे मेट्रोची अद्ययावत माहिती नागरिकांपर्यंत पोहचवणार आहे. या माहिती केंद्रात मेट्रो कोच संबधीची वैशिष्ट्ये दर्शविण्यात येतील ,मेट्रोचे स्टेशन , नकाशे , माहितीपुस्तिका , आणि ३ इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले उपलब्ध आहेत . त्यामुळे येथे भेट देणाऱ्या नागरिकांना प्रकल्पा संबधी माहितीपट देखील पाहायला मिळेल . प्रत्यक्षात कोच मध्ये दोन हवा नियंत्रक बसविण्यात आलेले आहेत . त्यामुळे थंडपणा किंवा उष्णतासुद्धा गरजेनुसार आटोक्यात ठेवण्यात सुलभ होईल . कोच च्या आतील बाजूस जिथे प्रवासी बसणार आहेत , त्या ठिकाणचे वातावरण आपोआपच नियंत्रणात ठेवण्यात येइल. हे माहिती केंद्र सकाळी ७ ते रात्री आठ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले असणार आहे . १५ ऑगस्ट च्या दिवशी एकूण २००० नागरिकांनी या माहिती केंद्राला भेट दिली . या भेटी मध्ये कॉलेजच्या विद्यार्थ्यां पासून ते जेष्ठ नागरिकांचा सुद्धा समावेश होता .

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी पुण्यातील नागरिकांना आणि शाळेतील लहान मुलांना स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्या दिल्या . तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी माहिती केंद्राला भेट द्यावी असे आवाहन केले . आणि लोकांचे आभारही व्यक्त केले .